# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 June 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ जून २०२५ दुपारी १.०० वा.

****

जगभरात १७० देशात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होणार असून देशातील प्रत्येक गाव आणि शहरात योग दिन मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे, अशी माहीती, केंद्रिय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. नवी दिल्लीत आज त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला, योग दिनाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम इथं होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, तसंच दिल्लीत, लाल किल्ला, कर्तव्यपथ आणि लोधी गार्डन यासह १११ ठिकाणी योग दिन साजरा केला जाईल, अशी माहीती जाधव यांनी यावेळी दिली. प्रसार माध्यमांनी योग दिनाच्या पार्श्वभुमीवर मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी, असं आवाहन जाधव यांनी केलं आहे.

****

डिजिटल इंडियाने गेल्या अकरा वर्षांत तरुणांना नवोन्मेषाचा वापर करण्यास सक्षम केलं आहे, त्यामुळे जागतिक तंत्रज्ञान महासत्ता म्हणून भारताचं स्थान बळकट झालं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. याबाबत त्यांनी आपल्या सामाजिक माध्यमावर पोस्ट सामाईक केली. तंत्रज्ञानाच्या सामर्थ्याचा वापर केल्यानं लोकांना असंख्य फायदे मिळाले असून सेवा वितरण आणि पारदर्शकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे तसंच तंत्रज्ञान हे गरिबातील गरीब व्यक्तीचं जीवन सक्षम करण्याचं एक साधन बनलं आहे, असं ते म्हणाले. तंत्रज्ञानात प्रगती आणि देशाच्या आत्मनिर्भरतेला चालना देण्यात भारताच्या तरुण नवोन्मेषकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल त्यांनी कौतूक केलं.

****

गेल्या दहा वर्षा थेट लाभ हस्तांतरण – डीबीटीमध्ये नव्वद पटीने वाढ झाली आहे, अशी माहीती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी दिली आहे. २०१४ मध्ये ७ हजार कोटींचे थेट लाभ हस्तांतरण करण्यात आले होते, तर गेल्या आर्थिक वर्षात हे प्रमाण वाढून सहा लाख ८३ हजार कोटी झाले आहे, असंही सितारामन यांनी आपल्या सामाजिक माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

****

भारताचे युपीआय केवळ राष्ट्रीयच नाही, तर जागतिक ओळख बनली असून युपीआय सात देशात कार्यरत आहेत, जवळपास अडीच हजारांपेक्षा जास्त पटीनं उलाढाल वाढली असून २६० लाख कोटींपेक्षा जास्त व्यवहार झाले आहेत. युपीआय युएई, भुटान, सिंगापूर, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स, मॉरिशिश या देशात सुरु आहे. प्रत्येक वर्षी जवळपास एक लाख ८५ हजार ६०० कोटींपेक्षा अधिक व्यवहार झाले आहे. तर दर मिनिटाला ४ लाखांहून अधिक व्यवहार प्रक्रिया करण्याची क्षमता युपीआयमध्ये असल्याचं या बाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले आहेत. मृतांमध्ये पाच लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या नक्षलवाद्यासह एका महिलेचा समावेश आहे. नक्षलवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून या परिसरात शोध माहीम अद्यापही सुरु आहे.

****

ऑपरेशन सिंदूर मोहिमेची हेटाळणी करणं म्हणजे संपूर्ण भारतीयांचा अपमान आहे, असं भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. काँग्रस पक्षाचे नेते आमदार नाना पटोले यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभुमीवर बावनकुळे आज मुंबई इथं माध्यमांशी बोलत होते. पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या अड्ड्यावर केलेली धाडसी आणि शौर्याची कारवाई ही मोहिम आहे. ऑपरेशन सिंदूर ही देशद्रोह्यांच्या छातीत धडकी भरवणारी जाज्वल्य शौर्यगाथा आहे, हे पटोले यांनी ध्यानात घ्यावं, असंही बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

****

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी विविध १७ मागण्यांसाठी पुकारलेल्या आंदोलनाच्या आजच्या पाचव्या दिवशी बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. दरम्यान, प्रहारच्या कार्यकर्त्यांनी आज अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावर नांदगावपेठ टोल नाक्याजवळ टायर जाळून रास्ता रोको केला. या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती, असं याबाबच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

रत्नागिरीतून गणपतीपुळ्याला जाणाऱ्या रस्त्यावर काळबादेवी इथं दोन एसटी बसची समोरासमोर धडक होऊन आज सकाळी अपघात झाला. यामध्ये दोन्ही बसचे चालक किरकोळ जखमी झाले असून, सर्व प्रवासी सुखरूप आहेत. या अपघातातील शहर वाहतूक विभागाची बस रत्नागिरीच्या दिशेने येत होती तर महामंडळाची बस गणपतीपुळ्याच्या दिशेने जात होती, त्यावेळी हा अपघात झाला.

****

राज्यात अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तर मराठवाड्यातल्या बहुतांश भागात येत्या चौदा तारखेपर्यंत वादळी वारे आणि मेघगर्जनेसह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. आगामी तीन दिवस उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई महानगर क्षेत्र वगळता संपूर्ण राज्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

****

आयसीसी विश्व कसोटी अजिंक्यपदासाठीच्या अंतिम सामन्यात लंडनमधील लॉर्ड्सवर काल पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २१२ धावांत आटोपला. ब्यू वेबस्टरनं सर्वाधिक ७२ धावा केल्या. तर दक्षिण आफ्रिकेच्या कागिसो रबाडानं ऑस्ट्रेलियाचे पाच गडी बाद केले.

****